Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4 सहाय्यक प्राध्यापिका किर्ती लहू महाडिक. ISSN:-2230-7850

Research Papers

# ''बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास''

*सहाय्यक प्राध्यापक प्रदिप भगवान.नेरकर*
एम.ए.,एम.एड.,एम.फिल.,सेट.,नेट.
पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शहादा
पीन कोड – 425409

*सहाय्यक प्राध्यापिका किर्ती लहू महाडिक.*
एम.ए.,एम.एड.,एम.फिल.
पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शहादा
पीन कोड – 425409

*सारांश :–*

प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा अभ्यास केलेला आहे. सदर संशोधनासाठी नंदुरबार जिल्हयातील 200 बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्ता व त्यातील घटकांचा सखोल अभ्यास केलेला आहे. त्यात असे आढळून आले की, बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांमध्ये भावनिक बुध्दिमत्ता चांगल्या दर्जाची आहे. प्रशिक्षण कालावधीतील वातावरण, मार्गदर्शन व विविध उपक्रमांद्वारे शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्ता वाढविण्यास मदत होत असते.

***प्रस्तावना :–***

भावनिक बुध्दिमत्तेचे विविध क्षेत्रातील वाढते महत्व लक्षात घेता शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता जास्त असणे व्यक्ती, समाज, राष्ट्र व प्रगतिच्या दृष्टीने आवश्यक आहे. कारण इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा शिक्षण हा व्यवसाय व शिक्षकांचे समाजातील स्थान व त्याची भूमिका वेगळी व महत्वपूर्ण आहे. इतर व्यवसायामध्ये निर्जिव वस्तूवर प्रक्रिया केली जाते. पहिल्यावेळी थोडी चूक झाली तर ती दुरूस्त करता येते. अगर ती वस्तू बाजुला टाकून देता येते. पण शिक्षणाच्या माध्यमातून संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांच्या आचार– विचारांना वळण लावले जाते. बी.एड्. प्रशिक्षणार्थीकडे भावी शिक्षक म्हणून पाहिले जाते. बी.एड्. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ते माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर सहशिक्षक म्हणून पदावर काम करतात. साधारणपणे उत्तर किशोरावस्था व कुमारावस्थेतील बालके हे त्याचे विद्यार्थी असतात. भावनात्मक अविष्काराला वळण लावण्याच्या दृष्टीने हा वयोगट महत्वाचा समजला जातो. या विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक भावना, प्रेरणा, क्षमता, गरजा समजून घेवून त्यांच्या आचार–विचारांना सुयोग्य वळण लवण्याचे काम शिक्षकांना करावयाचे असते म्हणून भविश्यकालीन शिक्षकांच्या जबाबदाऱ्या पेलण्याचे सामर्थ्य प्रशिक्षण काळातच प्राप्त होणे आवश्यक आहे.

***3.संशोधनाची उद्दीष्टे :–***

1) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा अभ्यास करणे.
2) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेतील संवेदनशीलता,परिपक्वता, व कार्यक्षमता घटकांचा अभ्यास करणे.
3) शहरी बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व ग्रामीण बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दीमत्तेचा तौलनिक अभ्यास करणे.
4) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व बी.एड्. प्रशिक्षणार्थी शि×क्षकेच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तौलनिक अभ्यास करणे
5) उच्च आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व निम्न आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तौलनिक अभ्यास करणे.

***4. संशोधन परिकल्पना :–***

1) शहरी बी.एड. प्रशिक्षणार्थी शिक्षक व ग्रामीण बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेत सार्थ फरक नाही.
2) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकापेक्षा बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकेमध्ये भावनिक बुध्दिमत्ता अधिक असते.
3) उच्च आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व निम्न आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेत सार्थ फरक नाही.

***5.संशोधनाची गृहीतके :–***

1) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या व्यक्तीमत्व विकासात सकारात्मक बदलांसाठी भावनिक बुध्दिमत्ता उपयोगी ठरतात.
2) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेमुळे सामाजिक दर्जा सुधारण्यास मदत होते.

**Please cite this Article as :** *किर्ती लहू महाडिक , प्रदिप भगवान.नेरकर , ''बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास''* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**

***6. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :—***

1) प्रस्तुत संशोधन नंदुरबार जिल्हयातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.
2) प्रस्तुत संशोधन नंदुरबार जिल्हयातील मराठी माध्यमाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरतेच मर्यादित आहे.
3) प्रस्तुत संशोधन नंदुरबार जिल्हयातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत येणाऱ्या मराठी माध्यमाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.

***7. संशोधन पध्दती व कार्यवाही :—***

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. कारण सर्वेक्षण पध्दतीद्वारा वर्तमान काळातील समस्येचा अभ्यास केला जातो. प्रस्तुत संशोधनासाठी प्रमाणीत प्रश्नावली बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांना देवून माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन केले.

***8. जनसंख्या व नमुना :—***

प्रस्तुत संशोधन हे नंदुरबार जिल्हयातील शिक्षणशास्त्र महाविद्याल्यातील बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांशी संबंधित आहे. नंदुरबार जिल्हयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव संलग्नित 07 शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. 900 ही जनसंख्या असून, 200 बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांची सुगम यादृच्छिक पध्दतीने नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

***9.माहिती संकलनाची साधने :—***

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी प्रमाणित प्रश्नावलीचा वापर केला गेला आहे. प्रा. एन.के.चढ्ढा व डॉ. दलीपसिंग यांनी प्रमाणित केलेल्या भावनिक बुध्दिमत्ता प्रश्नावलीचा वापर केलेला आहे. प्रमाणित प्रश्नावलीत एकूण 22 प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे देण्यात आलेली आहेत. भावनिक बुध्दिमत्तेतील संवेदनशीलता, यात परिपक्वता, व कार्यक्षमता या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

***10. माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण :—***

प्रस्तुत संशोधनात भावनिक बुध्दिमत्ता या प्रमाणित प्रश्नावलीद्वारे माहितीचे संकलन केले. त्यानंतर मध्यमान, प्रमाणविचलन आणि ज प्राप्तांक काढले. माहिती विश्लेषणात वरील सांख्यिकीय तंत्राचा वापर केला.
उद्दिष्टे : 1) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा अभ्यास करणे.


| अ. क्र | वर्गवारी | भावनिक बुध्दिमत्तेचे विवरण | बी.एड प्रशिक्षणार्थी शिक्षकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | ४४० ते ३५९ | उच्च भावनिक बुध्दिमत्ता | ३५ | १७.५% |
| २ | ३५८ते २७६ | निम्न उच्च भावनिक बुध्दिमत्ता | ८५ | ४२.५% |
| ३ | २७५ते १९३ | सामान्य भावनिक बुध्दिमत्ता | ६४ | ३२% |
| ४ | १९२ ते १११ | निम्न सामान्य भावनिक बुध्दिमत्ता | १६ | ८% |
| ५ | ११० पेक्षा कमी | निम्न भावनिक बुध्दिमत्ता | ०० | ००% |

***अर्थनिर्वचन :—***

1. बी.एड. प्रशिक्षणार्थी 17.5: शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता उच्च भावनिक बुध्दिमत्ता आहे.
2. बी.एड. प्रशिक्षणार्थी 42.5: शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता निम्न उच्च भावनिक बुध्दिमत्ता आहे.
3. बी.एड. प्रशिक्षणार्थी 32: शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता सामान्य भावनिक बुध्दिमत्ता आहे.
4. बी.एड. प्रशिक्षणार्थी 8 शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता निम्न सामान्य भावनिक बुध्दिमत्ता आहे.
5. बी.एड. प्रशिक्षणार्थी शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता निम्न भावनिक बुध्दिमत्ता नाही.

***उद्दिष्टे :—*** 2) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेतील संवेदनशीलता,परिपक्वता, व कार्यक्षमता घटकांचा अभ्यास करणे.

| भावनिक बुध्दिमत्ता | संवेदनशीलता | परिपक्वता | कार्यक्षमता |
|---|---|---|---|
| टक्केवारी | ४५% | ३५% | २०% |




**Please cite this Article as :***किर्ती लहू महाडिक , प्रदिप भगवान.नेरकर , ''बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास''* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**

*अर्थनिर्वचन :—*

1) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेतील संवेदनशीलता घटक 45: आढळून आलेला दिसून येतो.
2) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेतील परिपक्वता घटक 35: आढळून आलेला दिसून येतो.
3) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेतील कार्यक्षमता घटक 20: आढळून आलेला दिसून येतो.

***उद्दिष्टे*** :—3) शहरी बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व ग्रामीण बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दीमत्तेचा तौलनिक अभ्यास करणे.

कोष्टक क्रमांक 1

शहरी व ग्रामीण बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान,प्रमाणविचलन व ज प्राप्तांक

| नमुना गट | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | t प्राप्तांक | सार्थकता स्तर ०.०५ |
|---|---|---|---|---|---|
| शहरी बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक | ११२ | ९५.०४ | १७.३२ | १.१० | असार्थक |
| ग्रामीण बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक | ८८ | ९२.०७ | १७.१३ | | |

*अर्थनिर्वचन :—*

शहरी बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे मध्यमान 95.04 तर प्रमाणविचलन 17.32 आहे. ग्रामीण बी.एड्.प्रशिक्षणाथ्री शिक्षकांचे मध्यमान 92.07 तर प्रमाणविचनलन 17.13 आहे. शहरी व ग्रामीण बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे ज प्राप्तांक 1.10 आहे.

0.05 च्या सार्थकता स्तरासाठी क198 करिता ज सारणी मूल्य 2.60 आहे 1.10प्राप्त ज मूल्य हे सारणी ज मूल्यापेक्षा कमी आहे. 1. 10झ2.60 म्हणून याचाच अर्थ शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

उद्दिष्टे :— 4) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षिकेच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तौलनिक अभ्यास करणे.

कोष्टक क्रमांक २

बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व शिक्षिकेच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान, प्रमाणविचलन व t प्राप्तांक

| नमुना गट | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | t प्राप्तांक | सार्थकता स्तर ०.०५ |
|---|---|---|---|---|---|
| बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक | १०१ | ९५.८ | १२.८६ | ४.७० | सार्थक |
| बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षिका | ९९ | ८७.७ | ११.४८ | | |

*अर्थनिर्वचन :—*

बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे मध्यमान 95.08 आहे तर प्रमाणविचलन 12.86 आहे. बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षिकेचे मध्यमान 87.7 आहे तर प्रमाणविचलन 11.48 आहे. बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षक व बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षिकेचे ज प्राप्तांक 4.70 आहे.

0.05 च्या सार्थकता स्तरासाठी कत्रि 198 करिता ज मूल्य 2.60 आहे.प्राप्त ज मूल्य हे सारणी ज मूल्यापेक्षा अधिक आहे. 4.70झ2. 60 म्हणून या ठिकाणी संशोधन परिकल्पेनचा स्वीकार करावा लागेल.

***उद्दिष्टे*** : — 5) बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांचा उच्च व निम्न आर्थिक स्तरानुसार भावनिक बुध्दिमत्तेचा तौलनिक अभ्यास करणे.

कोष्टक क्रमांक ३

उच्च आर्थिक स्तर व निम्न आर्थिक स्तरावरील बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचा भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान, प्रमाणविचलन व t प्राप्तांक

| नमुना गट | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | t प्राप्तांक | सार्थकता स्तर ०.०५ |
|---|---|---|---|---|---|
| उच्च आर्थिक स्तर असलेले प्रशिक्षणार्थी शिक्षक | १०८ | ९६.८२ | १३.७७ | ४.८० | सार्थक |
| निम्न आर्थिक स्तर असलेले प्रशिक्षणार्थी शिक्षक | ९२ | ८८.२८ | ११.४२ | | |

***अर्थनिर्वचन :—***

उच्च आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे मध्यमान 96.82 आहे तर प्रमाणविचलन 13.77 आहे. निम्न आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे मध्यमान 88.28 आहे तर प्रमाणविचलन 11.42 आहे. उच्च आर्थिक स्तर असलेले बी. एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व निम्न आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे ज प्राप्तांक 4.80 आहे.

0.05 च्या सार्थकता स्तरासाठी कत्रि 198 करिता ज मूल्य 2.60 आहे.प्राप्त ज मूल्य हे सारणी ज मूल्यापेक्षा जास्त आहे. 4.80झ2. 60 म्हणून याचाच अर्थ शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

***निष्कर्ष :—***

1) शहरी बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व ग्रामीण बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेत फरक आढळून आलेला दिसून येतो.
2) बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकापेक्षा बी.एड्. शिक्षक प्रशिक्षणार्थी शिक्षिकेंची भावनिक बुध्दिमत्ता अधिक आढळून आलेली दिसून येते.
3) उच्च आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षक व निम्न आर्थिक स्तर असलेले बी.एड्. प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेत सार्थ फरक आढळून आलेला दिसून येत नाही.

***संदर्भ ग्रंथ :—***

1) करंदीकर सुरेश : अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र ; फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) चौधरी शोभा : अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र; व्यंकटेश प्रकाशन, पुणे.
3) जगताप ह.ना : शैक्षणिक मानसशास्त्र; अनमोल प्रकाशन, पुणे.
4) डबीर दिपा दिलीप :भावनिक बुध्दिमत्तेचा एक व्यावसायिक मार्गदर्शन; डायमंड पब्लिकेशन, पुणे.
5) पंडीत बं.बि. : शिक्षणातील संशोधन; नुतन प्रकाशन, पुणे.
6) भितांडे वि.रा. : शैक्षणिक संशोधन पध्दती; नुतन प्रकाशन, पुणे
7) मस्के टि.ए. : शैक्षणिक संख्याशास्त्र; इनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

**Please cite this Article as :** *किर्ती लहू महाडिक , प्रदिप भगवान.नेरकर , ''बी.एड्.प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास''* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**